**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

गोपनीय/महत्वाचे

क्र.रामं/परीक्षा-२/६२०६
पुणे-४११००४
दिनांक -२७/११/२०१८

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा बहुसंची (A,B,C,D चार संच) प्रश्नपत्रिकांबाबत

संदर्भ:-१)राज्यमंडळाचे पत्र क्र.रामं/परीक्षा-२/५८५९ दिनांक २३/९/२००४
२)बालभारतीचे पत्र क्र.ह. भाषा-भाषेतर/८३१४ दिनांक २२/११/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुलक्षून आपणास कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्र क्र.१ अन्वये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी इंग्रजी (द्वितीय/तृतीय भाषा) व गणित(भाग १ व २) या विषयांसाठी आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षा इंग्रजी विषयासाठी बहुसंची (A,B,C,D चार संच) प्रश्नपत्रिका योजना ऑक्टोबर २००४ च्या परीक्षेपासून सुरु करण्यात आलेली होती.

परंतु संदर्भांकित पत्र क्र.२ अन्वये बालभारतीने कळविल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माध्यमिक स्तरावरील इ.९ वी व इ.१० वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची निर्मिती आणि त्याआधारे नवीन पाठ्यपुस्तकांची निर्मिती महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळामार्फत करण्यात आलेली आहे. त्यानुसार इ.१० वी साठी पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात आलेली असून सदर नवीन अभ्यासक्रमाची इ.१० वी ची प्रथम परीक्षा मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणार आहे.

इ.९ वी व इ.१०वी साठी अभ्यासक्रम पुनर्रचना आणि त्याआधारे पाठ्यपुस्तके निर्मिती करताना सर्व विषयांच्या संदर्भात काही प्रमुख रचनात्मक बदल विविध विषय समित्या/अभ्यासगटांनी सुचविलेले आहेत. पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट विषयांचे स्वरूप हे प्रामुख्याने कृतिकेंद्रित ठेवण्यात आलेले आहे. ज्ञानरचनावादावर आधारीत आशयाचा समावेश पाठ्यपुस्तकामध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत शालान्त परीक्षेसाठी संपादित होत असलेल्या कृतिपत्रिका /प्रश्नपत्रिकांमध्ये आकलन, उपयोजन, रसग्रहण, अभिव्यक्ति विकास यावर आधारीत प्रश्नांचा समावेश आहे. मुक्तोत्तरी प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे मत व्यक्त करता येणार आहे. पाठांतराचा अवलंब करून उत्तरे देण्यास आता वाव राहणार नाही. कृतिपत्रिका /प्रश्नपत्रिकांमध्ये पाठ्यपुस्तकातील आशयावर आधारीत पण पाठ्यपुस्तकाबाहेरील आव्हानात्मक प्रश्न असणार आहेत.

कृतिपत्रिका/ प्रश्नपत्रिकांची अंमलबजावणी आणि मूल्यमापन करणे या प्रक्रियांमध्ये सुलभता राहण्याच्या दृष्टिने त्यांचे स्वरूप पूर्णपणे बदलण्यात आलेले आहे. त्यामुळे इ.१० वी साठी इंग्रजी(द्वितीय/तृतीय भाषा) व गणित(भाग-१ व २)विषयतज्ज्ञांनी सदर विषयांना बहुसंची प्रश्नपत्रिका देण्याची आवश्यकता नाही असे अभिप्राय बालभारती कार्यालयाकडे दिलेले असून त्यांच्या अभिप्रायानुसार मंडळामार्फत घेण्यात येत असलेल्या इ.१० वी परीक्षेच्या बहुसंची प्रश्नपत्रिका (A,B,C,D चार संच) योजनेत बदल करून मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेपासून पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बहुसंची प्रश्नपत्रिकांऐवजी इंग्रजी(द्वितीय/तृतीय भाषा) व गणित(भाग-१ व २)या विषयांसाठी एकच प्रश्नपत्रिका पुरविण्यात येणार आहे. त्यानुसार बहुसंची प्रश्नपत्रिकांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | परीक्षा | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा पुनर्रचित अभ्यासक्रम (इ.१० वी)(New Course) | मार्च २०१९ च्या इ.१० वी परीक्षेपासून पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी (द्वितीय/तृतीय भाषा) व गणित (भाग-१ व २)या विषयांसाठी बहुसंची प्रश्नपत्रिकांऐवजी एकच प्रश्नपत्रिका राहील. |
| २ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) (पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी) (Repeater Candidate) (अंतिम संधी) | मार्च २०१९ च्या इ.१० वी परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी(द्वितीय/तृतीय भाषा) व गणित(भाग-१ व २) या विषयांसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे A,B,C,D अशा चार संचात प्रश्नपत्रिका राहील. |
| ३ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) साठी इंग्रजी विषयासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे A,B,C,D अशा चार संचात प्रश्नपत्रिका राहील. |

तेव्हा वरीलप्रमाणे बहुसंची प्रश्नपत्रिका योजनेसंदर्भात बदललेल्या कार्यपध्दतीबाबत मार्च २०१९ च्या इ.१० वी परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रसंचालक, उपकेंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परिरक्षक, परीक्षक ,नियामक व अन्य संबंधित घटकांना आपल्या स्तरावरून योग्य त्या सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४

---

क्र.को.वि.मं./माध्य. गोप./ २४५८
कोल्हापूर-४१६००४
दिनांक : ११/१२/२०१८

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

उपरोक्तप्रमाणे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या बहुसंची (A,B,C,D) प्रश्नपत्रिकांबाबत झालेल्या बदलाची माहिती आवश्यक त्या कार्यवाही तथा माहितीस्तव

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर